दिनांक २६/०९/२०२३

# प्रेसनोट प्रसिध्दीसाठी

**विषय :- गणेशोत्सव विसर्जन सन २०२३ बाबत**

- पुणे शहराची सांस्कृतीक प्रतीमा समजला जाणारा गणेशोत्सव हा गेल्या कित्तेक वर्षाप्रमाणे सन २०२३ मध्ये देखिल मोठया जल्लोषात व दिमाखात साजरा केला जात आहे,व या उत्सवाची सर्वात मोठी व महत्वाची अशी कायदा व सुव्यवस्था पार पाडण्याची जबाबदारी गेल्या सहा दिवसापासून पुणे शहर पोलीस दल अतिशय सक्षम पणे दिवस व रात्र पार पाडत आहे.पुणे शहरातील गणेशोत्सव देशभरात लोकप्रिय असल्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातुन तसेच भारतातील विविध राज्यातुन गणेशभक्त पुणे शहरात येतात.
- दि २८/०९/२०२३ रोजी पुणे शहरातील गणेशोत्सव २०२३ ची सांगता होणार असुन लाखोच्या संखेने गणेशभक्त मिरवणुकांमध्ये सहभागी होउन श्री गणेशाला निरोप देणार आहेत.या सर्व गणेशभक्तांची व पुणेकरांची सुरक्षितता जपण्यासाठी पुणे शहर पोलीस दल कटिबध्द आहे.
- पुणे शहरात दि १९/०९/२०२३ रोजी सार्वजनिक गणेश मंडळे **३८६५** तसेच घरगुती **६१४२५७** गणपतींची स्थापना झालेली आहे.
- गणेशोत्सवाकरीता पुणे शहरातील सार्वजनिक गणेश मंडळे, ढोलताशा पथके, आणि इतर संबंधित शासकिय विभाग यांचेसोबत समन्वय बैठका घेण्यात आल्या आहेत.
- पुणे शहर पोलीस दलातील बीडीडीएस पथके, आरसीपी, क्युआरटी पथके गणेशोत्सव अनुशंगाने कार्यान्वित करण्यात आली आहेत.
- पुणे शहरातील गणेशोत्सव करीता पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडील व बाहेरील जिल्हयाकडुन मिळालेले मनुष्यबळ पुणे शहरात दि १९/०९/२०२३ रोजी पासुन ते संपुर्ण गणेश विसर्जन होईपर्यंत खालील प्रमाणे बंदोबस्तकरीता तैनात करण्यात आलेले आहेत.

| अपोआ | पोउआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउनि | अंमलदार | होमगार्ड | एस.आरपी.एफ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | १० | २५ | १५५ | ५७८ | ६८२७ | ९५० | ०२ कंपन्या |

- गणेशोत्सव कालावधीत लोकांना वाहतुकीस अडथळा होवु नये यासाठी वाहतुकीचे मार्गामध्ये बदल करण्यात आलेले आहेत, नागरिकांना त्यांची वाहणे सुरक्षित रित्या पार्क करण्यासाठी एकुण २६ पार्किंगची सुविधा करण्यात आलेली आहे, त्याबाबत सविस्तर प्रेस नोट काढुन नागरीकांना माहीती देण्यात आलेली आहे. तसेच नागरिकांना वाहतुक मार्गदर्शनासाठी "सारथी गणेशोत्सव गाईड २०२३" चे फलक जागोजागी लावण्यात येत आहेत.
- गणेशोत्सव २०२३ मधे पुणे शहरातील मुख्य मिरवणुकांच्या मार्गांवर गणेशभक्तांच्या सोई साठी व मार्गदर्शनासाठी जागोजागी एल.ई.डी स्क्रीन लावण्यात आलेल्या आहेत.
- सदर कालावधीत काही अनुचित घटना घडु नये यासाठी गोपनिय यंत्रणा सतर्क करण्यात आली आहे.
- चैनस्नॅचिंग,महिला छेडछाड रोखण्यासाठी वेगवेगळी पोलीस पथके तैनात करण्यात आलेली आहेत.
- लहान मुले व वयोवृध्द यांचे सहाय्यतेसाठी मदत केंद्र उभारण्यात आलेली आहेत.
- आणीबाणीचे परिस्थीतीमध्ये ॲम्बुलेन्स साठी स्वतंत्र मार्ग नियोजीत करण्यात आलेले आहेत.
- पुणे शहर पोलीस आयुक्त श्री रितेश कुमार, व पोलीस सह आयुक्त श्री संदिप कर्णिक यांनी पुणे शहर पोलीस दलातर्फे गणेशोत्सव २०२३ अनुशंगाने गणेशभक्तांना हा उत्सव शांतता व आनंदात साजरा करता यावा या दृष्टीने प्रभावी नियोजन केले आहे.